म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय ०।२८७
दा क्र ११११
IRBK-0101111
IRBK-0101111
IRBK-0101111

म. ग्रं. सं. ठाणे
विषय नाटक
वा. नं. 233

# ंगीत मंडळी



किमत चार आणे



नाटककार—वि. ल. बर्वे, बी. ए. एलएल. बी.

ग्रंथ संग्रह
नं. ३२९

## मुंबई संगीत मंडळी.

# माणिक एम. ए.

लेखक—वि. ल. बर्वे, बी. ए. एलएल्. बी.

( या पुस्तकाचे सर्व प्रकारचे हक्क मुंबई संगीत मंडळीनें आपलेकडे राखून ठेवले आहेत. )

क्र. ११११
९।२८

आवृत्ति पहिली.

ता. १६ जानेवारी १९३२.

IRBK-0101111

किमत चार आणे.

# लेखकाची टीप.

लहानसें नाटक म्हणजे नाटिका नव्हें. नाटिकेची रचनाच निराळी असते.

मराठींतील आजपर्यंतची नाटिका मात्र केवळ—दोन तासांचें नाटक—झाली !

औपचारीक आभारांसाठीं म्हणून नव्हें, माझे समव्यवसायी मित्र आप्पा साठे व दादा खातू यांचे प्रस्तुत नाटिकेच्या बाबतींत खरोखरच आभार मानायचे आहेत ! पण—नकोच तें. नव्या वर्षदिनीं आपला आणखीं वेळहि घेणें नको.

या नाटकाचा प्रथम प्रयोग मुंबई संगीत मंडळीनें ग्रॅन्टरोड बॉम्बे थिएटरांत शनिवार ता. १६ जानेवारी १९३२ रोजीं करून दाखविला.

मुंबई ता. १६–१–३२. वि. ल. बर्वे.

# माणिक एम. ए.

श्री ... संग्रहालय
नं. ३८८

## अंक १ ला

### प्रवेश पहिला

( स्थळः—नानासाहेबांचा दिवाणखाना, उत्तम सजविलेला; कोच राऊंड टेबल्स, एका कोपऱ्यांत गादी व डेस्क, खिडक्यांना पडदे, फोनो, टेलिफोन वगैरे, )

[ पात्रेंः—बिंदूकाका कागदपत्रें चाळीत असतो. शेंडी पाठीवर सुटलेली. पुढच्या खिशाचा सदरा व वर बटनें लाविलेलें जाकीट. ]

**बिंदू०**—( घड्याळांत पाहून ) साडेचार वाजले, तरी अजून कसा गोविंदा येत नाहीं! ज्योति, अग ज्योति ! ( एक तरुण व देखणी मोलकरीण येते. ) जा पाहूं रस्त्यावर, गोविंदा दिसतोयसा पहा— [ ती हातानें कशाला म्हणून विचारते ] त्या कॅप्टन बाबूरावांना आणायला ! आपल्या माणिकताईना आज पहायला यायचं ठरलं आहे त्यांचं. जा, जा पाहूं !

**ज्यो०**—ते बहुत बडा हॉपसर हाय व्हय ?

**बिंदू०**—अग विमानं उडविणारे ! सरकारच्या विमान खात्याचे मुख्य ! पगार १५०० रुपये महिना ! जा जा जा ! पळ ! ( ज्योती जाते. ) आमची पूही प्रिव्हीयसमध्यें आहे म्हणा ! तिलाही असाच कुणी तरी वैमानिक, बॅरिस्टर किंवा आय. सी. एस. पाहिला पाहिजे. [परत पत्राकडे वळतो.] आं ! हा फोटो कुणाचा ? नी या पुडक्यांत कसा ? १९०० मधलं हें पुडकं ! नानासाहेबांच्या तारुण्यांतली कांहीं मानगड कीं काय ? पैसा पाहिजे हेंच खरं ! पैसा नसला म्हणजे लोक काय काय म्हणतात ! गोविंद आला वाटतं S S.

[ गोविंद येतो. ] गोविंद, गोविंद ! इथं जवळपास कुणी नाहीं, तुला मिळकतीची मख्खी सांगून ठेवतों. नोकरी कर, कुणाचीही–सरकारी अगर खाजगी, पण पैसा खा ! अरे, पैसा खाल्ल्याशिवाय पैसा कधीं जमत नसतो ! हृदयावर–पाहिजे तर हातावर–हें वाक्य कोरून ठेव. ( क्षुद्रतादर्शक हांसून गोविंद जायला निघतो. )

**गोविं०**—मुलगी पहायला आणायचं होय ! त्या–त्या बाबूरावांना ?

**बिंदू०**—होय रे बुवा ! माणिकताईंना पहाण्यासाठीं आज ५ वाजतां यायचं, असं नानासाहेबांचं व त्यांचं ठरलेलं आहे.

**माणि०**—[ प्रवेश ककरून ] काय, काय म्हणालांत बिंदूकाका ? नानासाहेबांनीं कुणाला बोलावलं आहे मला पहाण्यासाठीं ?

**बिंदू०**—( उभा राहून ) अहो, खुद्द नानासाहेबांनींच बोलावलं आहे, आपल्याला पहाण्यासाठीं. नानासाहेबच आले ! त्यांनाच विचारा मी काय म्हणतों तें ?

( नानासाहेब येऊन बसतात. )

**नाना०**—काय म्हणतोयस रे बिंदू ?

**बिंदू०**—काय विचारायचं तें विचारा आतां माणिकताई !

**माणि०**—काय मानगड आहे नानासाहेब ?

**नाना०**—बैस सांगतो ! ( माणिक जवळ बसते ) कॅप्टन बाबूराव–ते वैमानिक–कालच मुंबईला विमान घेऊन आले !—

**माणि०**—बरं बरं !

**नाना०**—ते आज लग्नाच्या उद्देशानं तुला पहायला येणार आहेत पांच वाजतां !

**माणि०**—इतक्या घाईनं ?

**नाना०**—अग, त्यांच्यावर उड्या पडतील आणखी दोन चार दिवसीं ! तुला मागमूसही लागूं न देण्याला कारण, तितका अवसरही नव्हता मिळाला या क्षणापर्यंत. शिवाय तूं आतां एम्. ए. झालेली ! जें माझ्या मनांत तेंच तुझ्या मनांत असणार !

**माणि०**—म्हणजे ? यापुढं लग्न न करण्याचं ना ?

**नाना०**—छान विनोद केलास ! शक्य तितकं उत्तम स्थळ शक्य तितक्या लौकर पकडायचा माझा मनोदय आहे. येऊं देत ना पहायला !

**माणि०**—त्यापेक्षां मीच गेलें असतें त्यांच्याकडे—

**नाना०**—छेः छेः ! लोक काय म्हणतील ?

**माणि०**—लोकांचा काय संबंध त्यांत ?

**नाना०**—काय म्हणजे ? कोण इसम कसा आहे, हें पाहिल्याशिवाय त्याच्याकडे तुला वधू म्हणून जाऊं देणं अनिष्ट आहे.

**माणि०**—मग कोण इसम कसा आहे, हें निश्चित झाल्याशिवाय त्याला वधू पहाण्याकरतां घरांत घेणं हें त्याहूनही अनिष्ट आहे.

**नाना०**—पण आतां त्याचा खल्च नको. जा तूं. कपड्यालत्त्याच्या तयारीनं राहा.

**माणि०**—त्यापेक्षां नानासाहेब, मला एखादी उत्तमशी नोकरी मिळवून द्या. मी एम्. ए. आहें.

**नाना०**—अग, असला नवरा मिळाल्यावर आणखी काय पाहिजे ?

**माणि०**—म्हणजे ? पैशाचा प्रश्न सुटण्यासाठींच का माझा विवाह होणार ? आर्थिक पारतंत्र्यावर स्थायीभूत होणारा विवाह, नानासाहेब, नका माझ्या गळ्यांत बांधूं. निदान तूर्त तरी नको. मी नोकरी करणार व आर्थिक स्वायत्ततेनं राहून संसार करणार. श्रीमान् होण्याचीं लक्षणं दाखविणाऱ्या व अचानक आलेल्या नवरदेवाशीं, आम्हां बी. ए., एम्. ए. झालेल्या तरुणींचे विवाह तुम्हीं समाजाचे आधार म्हणविणारे लावीत असतां. माझ्यावर तो प्रसंग नको.

पद

जन धना गडे भुललें खचित आपदा ॥ ध्रु० ॥
प्रेम ही ने दुरी मंगल आसुरी ॥
मानी न सौख्य कदां ॥ १ ॥

**नाना०**—हें पहा, तुझं लग्नविषयक तत्त्वज्ञान सावकाश केव्हां तरी ऐकूं. कपडे करून ये प्रथम.

**बिंदू०**—नानासाहेब कुणी आलंय ! (स्व.) चंपूला नटून सजून बोलाविली आहे. पण तिचाही अद्याप पत्ता नाहीं. आलीच वाटतं. ( चंपू येते. )

**नाना०**—यावं चंपा ! पहा चंपूकडे. इतका मोहक वेष पेहरून ये, जा.

चंपू०—हें हो काय माणिकताई ! ते पहायला येणार, अन् तुम्ही आपल्या या अशा ! बरं तुमचं कपाट तर अगदीं कपड्यांनीं भरलेलं. ( बिंदूकाकाकडे पाहून ) आलें ना अगदीं तुमच्या मनासारखे कपडे करून ?

नाना०—अशी अज्ञाधारक पोर असली, म्हणजे बापालाही वरसंशोधनार्थ हुरूप येतो.

माणि०—बापांनी वरसंशोधन करायचे दिवस, नानासाहेब, अजूनही असावेत असं तुम्हाला वाटतं तर !

चंपू०—जा पाहू झकपक करून ये. पांच वाजायला झाले. (उभी रहाते)

बिंदू०—जावं ताईसाहेब ! नाहीं तर नानासाहेबांची उगाच ही होईल त्यांत ! ( उभा रहातो ).

नाना०—जा पाहू ! चल, चालती हो ! ( उभे राहतात ).

अनं०—कुठं दवडताय् माणिकताईंना ? ( अनंत हें बोलतच येतो. )

नाना०—आज तिला पहायला येणार आहेत कॅप्टन बाबूराव ! ही वेडी चांगलें कपडे करण्याचं नाकारते. अनंता, तूं तिला विनंति कर. ( अनंत लांब कुठं तरी पहातो. )

अनं०—वा ! माणिकताई ! या सणानिमित्त तरी जरतारी पातळं सार्थकीं लागूं देत. जा जा ! ( नानासाहेबांस ) केव्हां ? पांच वाजतां येणार काय ? झालीच की वेळ ! जा. अशा वेळीं सजायचं नाहीं, तर काय दुसऱ्या कुणाला तरी, तिसरीचा होणारा नवरा पहायला येईल, तेव्हां सजायचं ? जा. ( माणिक जाते.—चंपूकडे पाहून ) कसं काय चंपूताय् ? आहेऽऽबुव्वा ! खूप केलीत. कॅप्टनसाहेबांना प्रथमदर्शनींच गूढांत पाडाल ! आम्ही अर्थात सांगूंच नंतर, तुम्ही कोण त्या !

चंपू०—आजपर्यंत ज्या सलगीनं बोलला नाहीं, ती सूक्ष्म सलगी आज दिसून येत्येय ! हा एकूण माझ्या कपडेपट्टीचा प्रभाव तर !

अनं०—झिरझिरीत कपड्यांतल्या सुंदरीकडील एकच दृष्टिनिक्षेप वीस वर्षांच्या जुन्या ओळखीचा आभास उत्पन्न करतो. दिसलं स्त्रीसौंदर्य कीं बनवलीच नजर सूक्ष्म !

**चंपू०**—वाः ! अनंतराव, आजपर्यंत मी तुम्हांला सौंदर्याचे द्वेष्टे समजत होतें, पण--

**अनं०**—सौंदर्याचा द्वेष्टा ? सौंदर्याचा द्वेष करणं कुणाला शक्य आहे ? मी सौन्दर्याचा खरा उपासक व भोक्ताही आहें. फक्त एकच लक्षांत ठेव.

पद

**जग हें खुळें हें सगळें ॥**
**पाहीं सदा स्वरूपांत रमलें ॥ धृ० ॥**
**पाहुनी त्यांतील अभिनव शोभा ॥**
**येई चित्ता प्रमुदित सुदशा ॥**
**वरवर दावित चंचल लीला ॥ १ ॥**

**चंपू०**—काय काय !

**अनं०**—एवढंच लक्षांत ठेव कीं—

**चंपू०**—कीं काय ?

**अनं०**—सांगूंच ?

**चंपू०**—सांगा कीं ?

**अनं०**—सांगू का हो बिंदूकाका !

**बिंदू०**—बोला ना ! अजूनपर्यंत बोलतांना जसं. कांहीं सारखं मलाच विचारीत होतांत ! ( स्व० ) लोक काय म्हणतात तेंच मला पाहिजे आहे.

**चंपू०**—बोला बोला—खुशाल बोला !

**अनं०**—( तिच्यासमोर वरून खालीं बोट करीत ) हें मात्र खास सौंदर्य नव्हे ! यानं जे जवळ येऊं नयेसे वाटतात, तेवढेच नेमके जवळ यायचे. म्हणचे कोण समजलीस ?—कोण-? ( मोठ्यानें ) विवाहित !

**बिंदू०**—काय हें बोलतां ! (अनंता जवळ येतो) लोक काय म्हणतील !

**नाना०**—अरे अनंत, हे रे काय ? हे ऐकणारे लोक काय म्हणतील !

**अनं०**—नुसतं हें रे काय म्हणून म्हणतील, अगर पाठीमागं घाणेरडी कुजबुज करतील. मिळून ऐकणाराचं म्हणणं काय, तर कुणीही खरं बोलतां कामा नये.

**नाना०**—अरे, आपला पांढरपेशांचा समाज–

अनं०—ज्यांचे आधारस्तंभ निव्वळ लफंगे पण संपत्तिमान असतात—

चंपू०—संपत्तिमान् हेच केव्हांही समाजाचे आधार असणार.

अनं०—ते तसे आहेत म्हणूनच तुझा हा संपत्तीला ओढ लावणारा सौन्दर्याचा हव्यास !

चंपू०—होय. निदान संपत्तिमान् पुरुषच आपल्याशीं विवाहाला लायक, असं प्रत्येक कुमारिकेला, निदान मनातल्या मनांत तरी वाटतं. समाजाचे संपत्तिमान् आधार प्रथम आपल्या मुलींना बी. ए. एम. ए. करतात, व शिवाय वर हुण्डाही १०-२० हजारांचा देतात, ते काय मूर्ख म्हणून !

अनं०—पण एकच प्रश्न करतों, कीं त्यांत स्त्रीशिक्षणाला काळिमा नाहीं का लागत ? नोकरी करून आपला संसार चालवायची सवड कां नाहीं देत ? त्यांनींच आपला मनोमय नवरा शोधून काढावा, व त्यांचाही खर्च चालवून त्यांच्या हातून बौद्धिक कामगिरी पार पाडवावी. आज असे किती तरी तरुण आहेत, कीं ज्यांची स्वतंत्र संशोधन करण्यालायक बुद्धिमत्ता केवळ उपजीविकेच्या जंजाळामुळं पंगू बनून राहिली आहे !

नाना०—उदाहरणार्थ अनंतराव !

विंदू०—मी-मी-मी तेंच नांव घेणार होतें.

चंपू०—माझ्या ओंठावर तेंच नांव आलं—

अनं०—मग लाजलीस का ? माझं नांव न घ्यायला तूं माझ्या नांवाशीं बायकोपणा थोडाच जमविणार आहेस ? नानासाहेब, तुम्ही पांच हजार हुंडा चढवायचा, आबासाहेबांनीं सहा हजार करायचा, दादासाहेबांनीं सात हजार करायचा, काकासाहेबांनीं ब्लँक चेक द्यायचा, आणि तो सुद्धां बी. ए., एम्. ए. असलेल्या मुलीबद्दल. पाश्चिमात्य राष्ट्रांची सैन्य वाढविण्यांतलीच जणूं काय चढाओढ !

विंदू०—हुण्डा मात्र आपण जाम देणार नाहीं !

चंपू—गरीब जांवईही पदरीं जाम घेणार नाहीं ! कारण—

अनं०—व आर्थिक स्वातंत्र्यासाठींही जाम नोकरी करणार नाहीं !

विंदू०—( घाईनं उठून ) बाबूरावच येताहेत ! ( सर्व जण टाकटीक होतात. आंतून खूप ऐटबाज पोषाख करून माणिक येते. )

नाना०—दॅटस राइट, छान! ( नानासाहेब पुढें दुइंगमध्यें आतात. )

विंदू०—वाहवा रे वाहवा! माणिकबाई, तुम्हांला पाहिल्याबरोबर कॅप्टन हवेंतच उडायला पाहिजे!

चंपू—अगर जागच्या जागीं अनंतरावाप्रमाणं बर्फाचा पुतळा बनला पाहिजे!

माणि०—होय अनंतराव?

अनं०—प्रेमप्रधान विवाह केव्हां अमलांत येतील तें समाज जाणे!

( नानासाहेब 'या या' करीत कांहींसे पाठमोरे चालत येतात. मागून बाबूराव पाठीमागून सर्जू शिपाई, हातांत स्नफ बाटली घेतलेला-चिमटी पुढें कायमची धरून. नंतर गोविंद, असे प्र. क. )

नाना०—बसा कॅप्टनसाहेब! ही आमची माणिक एम्. ए.!

बाबू०—( वांकून रामरामाची ऐट करतो ) सो व्हेरी व्हेरी ग्लॅड टु मीट यू. मिस माणीक. सर्जू! ( सर्जू, चिमटी बाबूरावांच्या नाकाला लावतो)

नाना०—हे अनंतराव-बी. ए. आहेत. आमच्या एका जानी दोस्ताचे चिरंजीव, आपल्या अगदीं घरच्या मुलाप्रमाणें वागतात.

बाबू०—हुं: हुं: ( चंपूकडे पाहून ) आणि या विदुषी कोण?

नाना०—या आमच्या बिंदुकाकांची कन्या, म्हणजे आमच्या कारकुनाची.

विंदू०—मीच तो आपला, आणि हा-( गोविंदाला अनुलक्षून ) माझा मुलगा. अद्याप नोकरी लागायाची आहे!

बाबू०—[ हॅट टेबलावर ठेवतो, त्याच्या मागील खुर्चीवर बसतो. खुर्ची-मागें सर्जू उभा राहून चिमटी पुढेंच धरून राहतो. ) आपण बसा नानासाहेब. सर्व जण बसा. एक्स्क्यूज मी फॉर धिस स्नफ. ( ओढतो. ) हवेचे परिणाम टाळण्यासाठीं आहे हें. आपण कलेक्टर होतां नाहीं? पेन्शन घेऊन किती काळ लोटला?

नाना०—झालीं दोन वर्षं. एवढीच मुलगी.

बाबू०—ओन्ली डॉटर! ( समाधानानें ) आय सी; आपण अनंतराव, काय करतां?

अनं०—समाजसंशोधन!

बाबू०—म्हणजे काय ?

अनं०—रीसर्च वर्क इन सोशियॉलजी.

बाबू०—रीसर्च वर्कचा मलाही फार फार नाद आहे. यस्स. वर गेलं कीं हवेंत फार गंमती असतात. विमानांतली राहणी म्हणजे आर्घी फारच हवाशीर. दुर्गंधी नाहीं. ( माणिकला ) आपल्याला आवडेल का विमानांत फिरणं ? ( स्नफ ओढतो ).

माणि०—नाहीं आवडणार.

बाबू०—व्हॉमिटिंग होईल म्हणून ? उपाशीं पोटीं बसल्यावर काय टाप लागली आहे व्हॉमिटिंगची !

माणि०—ठरवीन मी, व कळवीन आपणाला शक्य झाल्यास.

बाबू०—चंपाबाई, आपलं कसं काय ?

चंपू०—मला पक्ष्याप्रमाणं स्वतंत्र, स्वतंत्र वाटेल !

बाबू०—बस बस ! अगदीं पक्षी ! पक्ष्यांतला पक्षी ! हेंच आजकाल स्पिरिट पाहिजे स्त्रीपुरुषांत. बरं आहे नानासाहेब. आपण चला सर्वांनीं ! मी म्हणजे गरुडपक्षी आहें माझ्यापुरता ! चलतां ना बाहेर ?

नाना०—मी आपणांकडून त्याच सूचनेची वाट बघतोय्.

बाबू०—संगमोत्सुकता हा मानवी धर्म आहे ! आय मीन् खाजगी भेट म्हणजे.

नाना०—(मानेनें सर्वांना चला असें सुचवतात) यू आर एन्टायटल्ड टू.

बाबू०—सर्जू तूंही जा. [ सर्व जातात. ]

[ माणिक उठून पुस्तक घेऊन वाचण्याचें निमित्त करते. बाबूराव तिच्याकडे निरनिराळ्या कोंपऱ्यांतून पहातो. दरवेळेस हाः हाः हाः हंसतो व मन मानेल तें इंग्रजी गाणें म्हणतो. ]

माणि०—हें हंसणं असभ्यपणाइतकंच अप्रस्तुत आहे. स्टॉप देअर.

बाबू०—मग काय करूं ?

माणि०—ज्या कामासाठीं आलांत, तें काम करा.

बाबू०—आय् सी. ( धाडकन् तिच्या शेजारीं कोचावर येऊन बसतो. ती उठून सहज दुसऱ्या खुर्चीवर बसते. ) फारच लांब गेलांत. ( कोच ओढतो )

माणि०—अंतर तोडायला सुरवात प्रथम दुरूनदुरूनच करावी लागते.

बाबू०—ऑल राईट. मग काय ? आय होप, यू लाइक मी.

माणि०—काय हरकत आहे ?

बाबू०—राइट. तुम्ही माझ्या मानानं फारच जास्त शिकलेल्या आहां, तरी पण नानासाहेबांनीं आपला पहिला जामात होण्याचा मान मलाच दिला आहे!

माणि०—म्हणजे पुढें केव्हां तरी माझा पुनर्विवाह व्हायचा आहे कीं काय !

बाबू०—आय ॲम व्हेरी सॉरी टू माय पुअर मराठी. आपण हें मराठी वातावरण सोडून देऊं, आपला सर्व पैसा नानासाहेब मलाच देतील.

माणि०—तो काय म्हणून ?

बाबू०—पैशाशिवाय लग्न नाहीं.

माणि०—आपण नुसतंच विनपैशानं माझ्याशीं लग्न लावावं.

बाबू०—ती एटिकेट नाहीं. पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वांची गोड सांगड मीं माझ्या जीवनांत घालून ठेविली आहे. वागतांना प्रत्येकाशीं पाश्चिमात्य तत्वानं वागतों, व वागणुकीच्या बुडाशीं वेदाभ्यासजड असं पौर्वात्य तत्त्वज्ञान ठेवतां. थोडी स्नफ कुठं मिळेल का ?

माणि०—सर्जू जवळून आणूं का ?

बाबू०—तूं ओढशील ना ?

माणि०—डॅम इट.

बाबू०—मग राहूं दे. मला वैमानिकाला काय ! धूर, धुकं, हवा, सारं कांहीं सारखंच. ( खिशांतून दोन सिगारेट्स काढतो. दोन्ही पेटवतो. एक माणिकपुढें करतो. ) वुड यू माईंड हॅविंग ए स्मोक !

माणि०—बेशरम !

बाबू०—[ स्व० ] इच्या—माझ्या शिक्षणात महदंतर आहे—अंतरपटानंतर तें कापून निघेल म्हणा ! ( उ० ) हिंदुस्त्रिया इतक्या मागं आहेत, याची मला कल्पनाही नव्हती. एक्सक्यूज मी. आय बेग युअर पार्डन.

माणि०—दॅट्स् ऑल राइट.

बाबू०—मग ठरवायचं ना आपलं लग्न ? आजपासूनच माझ्यावर प्रेम करायला सुरवात कर.

माणि०—मन हें यंत्र नव्हे, अगर प्रेम हा यंत्राचा प्रकर्षही नाहीं.

बाबू०—माझं यांत्रिक प्रेम यापुढं ( माणिकचा हात धरून ) या प्रेमाच्या यंत्राकडे मी लावणार आहें.

माणि०—हात धरण्याची काय गरज ? यंत्राला भावना नसते.

बाबू०—पण यंत्राला तेलाची सगाई असल्याशिवाय-( मुका घेण्याचा अयशस्वी प्रयत्न करतो ).

माणि०—नानासाहेब-( म्हणून मोठ्यानें ओरडते; अनंत येतो. )

अनं०—काय, काय झालं ? ( माणिक दूर जाऊन बाबूरावकडे रागानें पहाते. )

बाबू०—( शरमतो. ) ओ इटस् नथिंग. ( चंपू येते. )

चंपू०—काय, काय झालं ? विंचू बिंचू निघाला कीं काय ?

विंदू०—( चपल घेऊन धांवत येतो. 'विंचू विंचू' म्हणून जमिनीवर मारूं लागतो. )

सर्जू०—( धांवत येऊन, चिमटी बाबूरावाच्या नाकाला लावतो व त्यांच्या आंगावर स्नफ उपडी करतो. गोविंद येतो. )

गोविं०—नानासाहेबांनीं हांक मारली आहे बागेंत कॅप्टन साहेब ! हें आंगावर काय तुमच्या ? अग ज्योति, ब्रश आण पाहूं ! ( ज्योति लांब दांडा असणारा थोरला ब्रश आणते व बाबुरावांजवळ जाते. )

सर्जू०—चिमकड्ये मॉल ब्रास आन न्हानुकला ! ( स्व० ) इस्कील पोर हाय !

नाना०—( प्र. क. ) काय काय गडबड आहे ?

बाबू०—नथिंग. माणिकताई जरा बिचकल्या इतकंच !

नाना०—काय ग माणिक ?

अनं०—रिसर्च वर्कच ना ?

माणि०—(हांसून बाबुरावाला कायमचा नमस्कार ठोकण्याच्या उद्देशानें म्हणते ) माफ करा बाबूराव. ( जाते. )

ना: १ ३

बाबू०—वुइ आर फ्रीजुड वुइथ ईंच आदर. फक्त या इतर लोकांनी येण्याची घाई केली अकारण.

नाना०—त्यांना काय समजतंय् कसं वागायचं तें! घ्या संभाळून.

बाबू०—(हॅट वगैरे घेऊन निघतो.) आय टेक यूअर लीव्ह. होणारच मी तुमचा जांवई! ठीक. (सर्वांना लवून एकच मुजरा करतो) गेलों बरं. (जातो.)

सर्जू०—नानासाब, साहेबांना ताईसाब द्या व मला ही ज्योतिसाब द्या! तरच समदं ठीक जमल. सान्या साहेबांचं काळीज पट्टेवाल्यांच्या खिशांत असतय् ( जातो. )

नाना०—लग्नाचा हा बार वाजला, कीं लोक काय म्हणतील बिंदू ?

बिंदू०—लोक च्याट होतील!

नाना—चला जाऊं बागेत. तिकडे चहा तयार असेल. ( दोघे जातात. )

अनं०—(स्व०) असल्या विषमविवाहांनीं कित्येक मुलांमुलींच्या आयुष्याचें मातेरें होत असेल!

पद

धनभावना नेई नाशा युवतियुवगणा आपदा ॥
विषमविवाहा जन्मदा ॥ धृ० ॥
हृदयवांच्छितां प्रेमपरिचयाला ॥
नेत हरुनियां सदा शुद्ध प्रेमा ॥ १ ॥

---

## प्रवेश दुसरा

( स्थळः—नानासाहेबांच्या बंगल्यालगतची बाग. )

ज्यो०—हाय हाय! आलंच की. आजचा नोक झोंक खास साहेबावानी हाय! ( पट्टेवाल्या पद्धतीचा पांढरा ड्रेस करून कमरेला लांबफेंटा गुंडाळलेला सर्जू येतो. )

सर्जू०—अगदीं बोलूं नकोस. साहेबांचं पत्र आहे नानासाहेबांला! (जाऊं लागतो. )

ज्यो०—अगदीं घोड्यावरून ? म्यां ज्योतीनं हटकलं तर काइच न्हाई व्हय ?

पद

राग न वरा सखया तिळातिळ जिव तुटला ॥ ध्रु० ॥
सजन समागमीं पुनित साजणी ॥
खुलवीत भाव सुखाचा ॥
विनवित उर भरला ॥ १ ॥

**सर्जू०**—( तिच्या जवळ जातो ). जोत ! जोत ! तूं म्हणजे माझ्या मायेचा झोत !

**ज्यो०**—अन् तुम्ही म्हंजी माझं सारं गणगोत ! समद्या मुलखाचा हुशार, कुट व्हनारबी न्हाई तुम्हासारका !

**सर्जू०**—जात अर्धमराठ्याची, पर पत हापसराची आहे. साऱ्या पांढरपेशांची खडानखडा वागणी माझ्यांत मुरलिया ! सांगशील तो कपडा करीन, सांगशील ती भाषा बोलेन, आन् म्हणशील त्या पोरीला नादीं लावीन. आजकाल मोठ्यांत काय शिजतंय याचा खुलासा हाय तुला ?

**ज्यो०**—काय काय सांगा बरी. ( एका बांकडीवर बसतात. ) ज्योती त्याला फूल देते. तो योग्य ठिकाणीं बसवतो. ) सांगा कीं काय आजकालचं नवं हाय तें ?

**सर्जू०**—बर्त कंट्रोल ! बर्त कंट्रोल ! ( निरनिराळ्या स्वरांत व उच्चारांत ) बर्त कंट्रोल ! हीं बघ पांपलिटा. मटवाडीच्या नाक्यावरलं दुकान. थर्त हा एकुणएक मसाला आहे !

**ज्यो०**—म्हंजी हें हाय तरी काय ?

**सर्जू०**—बर्त कंटोल म्हणजे, मरे तोंवर नुसतीं नवराबायको ऱ्हायाचं. पोर नको, बाळ नको. बाळंतपणांत समदी बायको थवकून जाते !

**ज्यो०**—बाळं होऊन खप्पड झालं तरी पुरवलं ! बारा मुलांचीं बारवीं करण्याची शामत हाय मला. अन् इकतं होउनश्यान जरा बी माझ्या बॉडीचा गोल न्हाई झुकणार ! बगा तर खरं ! आपनास्नी तर मुलं पायजे. बगा पटलं तर, न्हाई तर हतुनच् ( दूर जाऊं लागते. )

**सर्जू०**—माग फीर ज्योति ! तुला आपली थोरामोठ्यांची आजची गम्मत सांगितली ! नको तर ऱ्हायलो ! अगदीं तुझ्या मनाप्रमाणं ! विंग्लिश

लोक जराही मेमच्या बाहेर जात नाहींत. फार पाहिलींत जोडपीं. फार गमती ! फार मानगडी ! हीं बिजागरं ! (सिगारेट पेटवतो.) याशिवाय मी कांहीं कवाच पीत न्हाई. सिगारेट म्हंजी सिगारेट ! इनीडय. गोल्डफेक, पासिंगशो, रेडलॅंप, ड्रेडनाट, या साऱ्या शिगरेटीच ! (साहेबी ऐटीनें फुंकतो)

**ज्यो०**—मला बी मुलीबाळींच्या फ्यॅसिना अवगत हाइत. हातरुमाल कुटून कसा काडायचा. ( छाती जवळून रुमाल काढते ) सेंट तर बगा ! ( त्याच्या नाकाला लावते ) सेंटबिगर एकबी पोरटी न्हाई बाहीर जात आज काल. मी बी ठयवलीय् यक बाटली !

**सर्जू०**—बस बस बस ! तूं बी अगदीं प्रफेक्ट आहेस.

## लावणी

**तार जशी कलगीची ग गोड तुझी सलगी ॥**
**चल बोल येवून रंगांत । होऊं दंग प्रेमसंगांत ॥ धृ० ॥**
**बिजलीची लवती ज्योत । कर उजेड या हृदयांत ॥**
**त्या तेजावर सुंदरी करिन मी गमती नानापरी ॥**
**बसवीन तुला मम शिरीं ॥ १ ॥**

लग्न झाल्यावर नांव पार बदलून आपण गिरगांवांत राहायला जानार ! हें बघ ज्योति, तूं जरा आणिक भाषा सुधार—धनिणीसंगं, कीं जातीस नाइट स्कुलांत ? ( बिंदूकाका येतो. )

**बिंदू०**—सर्जेराव, हें पत्र व लिफाफा नेऊन द्या कॅप्टनसाहेबांना. आज सायंकाळीं आमची चंपू त्यांना भेटायला जाणार आहे. त्यांना म्हणावें, प्रथम टेलिफोन करा.

**सर्जू०**—यस यस ! माझं काम. आलाच आठ वाजतां टेलिफोन असं समजा. चंपूसाहेबांना तयार रहायला सांगा अगदीं तंग ! [ बिंदुकाका जातो. ] करूं गंमत या चंपूताईची, अन् या म्हाताऱ्याची ?

**ज्यो०**—आन् ती कशी ?

**सर्जू०**—तांजमहालांतून साहेब रात्रीं १२ वाजतां येईल. त्यापूर्वी स्वतःच देतों टेलिफोन. स्वतः करतो कॅप्टनसाहेबांचे कपडे ! नी करतों बिजागर कांहीं तरी !

**ज्यो०**—आन् राव, म्यां येऊं का ती गंमत बघायला !

सर्जू०—अग, ये की. यतच विजेच्या बत्तींत गंमत करूं लव्हची!
( इतक्यांत धांदली धांदलींनें चंपू येते. )

चंपू०—सर्जेराव, सर्जेराव! रात्रीं येणार बरं कां! साहेबांना सांगा. टेलिफोननं म्हणावं, वेळ प्रथम कळवा. ( चंपू जाते. )

ज्यो०—( स्व० ) आपूणच चंपू बनून जावं टेलिफोन आल्यावर! असंच करावं, अन् घ्यावी सर्जेरावांची परीक्षा. ( उ० ) जाती बरं का?

सर्जू०—ठरलं! साहेबाचा पायलट ड्रेस करून स्वतः साहेब म्हणून चंपूची गंमत उडवायची! करूं या तर एकदां रंग या नव्या साहेबांच्या नांवावर! ( तोंच नानासाहेब बाहेरून येतात. ) आलेच नानासाहेब. नानासाहेब, ( रामराम करतो. ) साहेबांचं पत्र. ताबडतोब उत्तर द्या. ( नानासाहेब वाचतात व चेहरा दुःखी करतात. )

नाना०—यावरच उत्तर देतों. ( लिहितात. ) कबूल आहे म्हणावं. ( सर्जू रामराम करून जातो. नानासाहेब बागेतल्या एका बांकावर कपडे काढून ठेवतात व चबुत्र्यावर बसतात—स्वगत ) ब्लॅंक चेकची ही मागणी कबूल केली खरी, पण माणिकला काय वाटेल? अनंतच आला वाटतं. ( अनंत येतो ) बिंदु, बिंदु एवढे कपडे घरांत ने. अरे, अनंत! ये पाहूं-कालपासून तूं इतका कष्टी कां? काल रात्रीं म्हणे तूं इथून ११।१२ वाजतां गेलास? बरं इथं जेवलाही नाहींस. त्या चार तासांत माणिक इतकं बोलली तरी काय?

अनं०—माणिक काय बोलणार! खूपसा तिनं त्रागा केला व शेवटीं रडली.

नाना०—कारण?

अनं०—कारण त्या वैमानिक मूर्खाजवळ लग्नाची सांगड जुंपली जाणार म्हणून!

नाना०—त्याला मूर्ख म्हणायला तुम्हांला काय आधार?

अनं०—काल संध्याकाळची त्याची वागणूक. पहिल्याच धूळभेटींत सिगरेट पुढें करण्यापासून ती जिथं धरायची त्या ओंठापर्यंत येऊन भिडणाऱ्याजवळ लग्नाला कोणती समंजस कुमारी तयार होईल?

नाना०—त्यांत काय झालं रे एवढं वावगं? त्याची वाच्यता झाली नाहीं म्हणजे बस्स!

**अनं०**—असल्यावर पांघरूण घालण्याचा तुमच्या असलेल्या प्रवृत्तीचा आम्हां नव तरुणांना संताप येतो. काय १५०० रुपये मिळविणारे म्हणून त्याचं हें कृत्य चालवून घेतां ? मीच वागूं का या पद्धतीनं खुद्द तुमच्या माणिकशीं ?

**नाना०**—अरे, अरे, फारच मडकलास ! लोक काय म्हणतील ? बाबूरावांचं वागणं गैरशिस्त तर खरंच, पण करायचं काय ?

**अनं०**—दोन तोंडांत मडकवायच्या आल्याबरोबर ! तुम्हांला मारतां येत नसतील तर मी मारून दाखवतों.

**नाना०**—छेः छेः ! महिना १५०० रुपये पगार ही एकच गोष्ट, लग्न निश्चित करण्याच्या बाबतींत कोणाही विचारवंताला पुरेशी आहे.

**अनं०**—फिरून तेंच ! अहो नानासाहेब, तुमची माणिक एम्. ए. आहे ! स्त्रीला दरमहा मिळणारे २०० रुपये हे तिच्या नादान नवऱ्याला मिळणाऱ्या १५०० रुपयांहूनही जास्त मोलाचे आहेत. पितृसत्ताक पद्धतींत रूढ असलेले निर्बंध सुशिक्षित स्त्रियांवर कां लादतां ? मातृसत्ताक पद्धति रूढ करण्याचा सुशिक्षित स्त्रियांचा हक्क आहे. तो हक्क त्यांचा त्यांना देऊन स्त्रीस्वातंत्र्य जाहीर करा. नाहीं तर बंड उभारून तो त्या हिरावून घेतील !

**नाना०**—डॉक्टर केतकरांचीं मतं बोलतोस झालं !

**अनं०**—होय. त्या व्यक्तीबद्दल मला फार आदर वाटतो. तुम्हांला मात्र तुमच्या हेक्याशिवाय दुसऱ्या कशाबद्दलही–प्रत्यक्ष तुमच्या मुलीबद्दलही–आदर वाटत नाहीं.

**नाना०**—नसेल आदर ! पण माया तर आहे ना ?

**अनं०**—त्याचीही मला शंकाच वाटते. माया म्हणजे काय, हें जर तुम्ही जाणतां तर तिच्या मायेचाही तुमच्याकडून ओघानंच विचार झाला असता.

**नाना०**—त्यांत कसला विचार करायचा ? विवाहोत्तर प्रेम हाच पौर्वात्य संकेत !

**अनं०**—पण त्या प्रेमाचे दोन्ही घटक पाश्चिमात्य संस्कृतींत तयार झाले आहेत हें मात्र विसरतां.

**नाना०**—( घाबरून ) त्याचा मात्र मीं विचार केला नाहीं. प्रेमाच्या बाबतींत तुझं म्हणणं विचार करण्यासारखं आहे खरं. तुला काय वाटतं ? तिचं कुणावर असेल प्रेम जडलेलं ?

**अनं०**—माझ्या माहितींत तरी नाहीं. कदाचित् नसेलही जडलेलं ! तिलाच विचारून घ्या खात्री करून. ( इतक्यांत माणिक एक तार घेऊन येते. )

**माणि०**—नानासाहेब, ही पहा तार. लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून सरकारी मुलींच्या हायस्कूलमध्यें २५० ची नोकरी मिळत आहे मला. आणखी ८ दिवसींच हजर व्हायला पाहिजे. ( तो अनंतरावाकडे समाधानानें पहाते. अनंतराव हें पाहून नानासाहेबाच्या हातांतील तारेकडे पहातो. )

**नाना०**—बरं. दे ठेऊन तूर्त, बस खालीं. बाबूरावांची कालची चुकी विसरून जा बरं !

**माणि०**—अशक्य !

**नाना०**—बरं राहू दे तेंही ! खरं सांग हं. तुझं कुणावर पूर्वीच प्रेम जडलेलं आहे ? लाजूं नकोस. अनंताला जायला सांगूं इथून ?

**माणि०**—त्यांत लाज कसली ? व अनंतरावांना जायला सांगण्यासारखी चोरी तरी कसली ?

**नाना०**—मग सांग ना ! जमलंय कुठं प्रेम ?

**माणि०**—होय.

**नाना०**—निदान तो श्रीमंत तरी असला पाहिजे बरं का !

**माणि०**—होय. अगदीं तस्साच आहे.

**नाना०**—तो कोण ?

**अनं०**—तो कोण ?

**नाना०**—कोण ? कोण ?

**माणि०**—( नानासाहेबाजवळ ) अनंत ! ( अनंतजवळ ) अनंत ! ( दोघेही विस्मयानें एकमेकांकडे पाहूं लागतात. खालचा ओंठ चिमटींत धरून अंतर्दृष्टीनें पण आनंदांत अनंत निघून जातो. )

**नाना०**—अनंतासारख्या गरिबाला जर मीं तुला माळ घालूं दिली, तर समाज काय म्हणेल ? लोक काय म्हणतील ?

**माणि०**—लोक काय ह्मणतील ? विचारी लोक आपल अभिनंदन करतील. भावी समाज आपल्यासारख्यांना आगरकरांइतका मान देईल. लफंगेगिरी व असत्य या कुजक्या आधारस्तंभांवरचा समाज निखळून काढून सत्य व स्वातंत्र्य या अभेद्य धोरणावर त्यास प्रस्थापित करण्याचा मान आपल्या वांट्यास येईल !

**नाना०**—गप्प बस. माझ्या घटनेचा विध्वंस अशा तऱ्हेनं करून घेण्यासाठीं का मीं तुला जन्म दिला ?

**माणि०**—मीही विचारतें, कीं सारा जन्म ढोंगावर काढण्यासाठीं का मला जन्माला घातलंत ? ( बिंदूकाका येतात. )

**नाना०**—( रागावून ) कां लुडबुड करतोस रे बिंदू ?

**बिंदू०**—कॅप्टन बाबूराव आले आहेत. त्यांचीच ही लुडबुड मला भोंवत्येय !

**नाना०**—होय का ! छान केलंत मध्येंच कळवायला आलेत ते. बोलवा त्यांना. तुमची लुडबुड कसची ! आमचीच लुडबुड. बोलवा त्यांना. ( जाऊं लागतो. )

**माणि०**—बिलकूल इकडे बोलवूं नका. ( बिंदु परत जाऊं लागतो. )

**नाना०**—इकडेच येऊं दे त्यांना, आमची बाग बघायसाठीं.

**बिंदू०**—ठाम असं काय सांगूं ?

**नाना०**—इकडेच बोलवा. ( बिंदू जातो. )

**माणि०**—मग मीच जातें नानासाहेब !

**नाना०**—खबरदार जाशील तर. ( बाबूराव येतात. )

**बाबू०**—माय डीअर माणिक ! मी तुमचा सहस्रशः अपराधी आहें. नानासाहेब, काल हजर असणाऱ्या साऱ्या व्यक्तींना बोलवा. मी त्यांची उघड उघड माफी मागणार आहें; खरं तें खरं !

**नाना०**—माणिक, पहा पहा ! केवढ्या मोठ्या माणसाची केवढी थोर लीनता ! बाबूराव, तुम्हीं सुचविलेला ब्लँक चेक मी सही करून देतों. अगदी या क्षणाला ! ( खिशांतून काढून सही करून देतात. )

**बाबू०**—( समाधानानें हांसून ) माझ्या मोटेपणाचं चीज फक्त या ब्लँक चेकनंच होणारं आहे, हें आपण जाणलंत ! नानासाहेब, आज रात्रीं आपण,

माणिक व माझे कांहीं मित्र, यांना ताजमहाल हॉटेलमध्यें मेजवानी देणार आहे. स्वीकारणार ना आमंत्रण ?

**नाना०**—मोठ्या प्रेमानं ! चहा करायला सांगून येतों हां–( नानासाहेब जातात. )

**माणि०**—बाबूराव, आपणांला एक विनंति करायची आहे.

**बाबू०**—विनंति कां ? आज्ञा म्हणा !

**माणि०**—या आहेत अर्थशून्य गप्पा !

**बाबू०**—बरं तर ! ॲज यू प्लीज.

**माणि०**—आपण तो ब्लँक चेक परत करा नानासाहेबांजवळ !

**बाबू०**—त्यात त्यांचाच अपमान होणार आहे.

**माणि०**—पण तो स्वीकारण्यांत आपण माझा अपमान करीत आहां. जसूं काय ब्लँकचेकच्या लांचेशिवाय स्वीकारण्यासारखी मी मुलगीच नव्हे होय!

**बाबू०**—त्यांत तुझा अपमान नसून माझा मान आहे ! ती वरदक्षिणा ना !

**माणि०**—ठीक. मला तुमच्याशीं लग्नच करायचं नाहीं तर !

**बाबू०**—कां ? माझ्यावर तुझं प्रेम नाहीं ?

**माणि०**—प्रेम हें हृदयावर करायचं असतं !

**बाबू०**—तुझं प्रेम माझ्या भावी संपत्तीवरही नाहीं ? मजकडून मिळणाऱ्या स्वातंत्र्यावरही नाहीं ? तुझ्या प्रेमाचा प्रश्न तरी काय ?

**माणि०**—संभावित भिकाऱ्यांपेक्षां जास्त संपत्तिमान् अगर अधिक स्वतंत्र आपण आहांत असं मला केव्हांही वाटणार नाहीं. म्हणून आपल्या बाबतींत प्रेमाचा प्रश्नही उद्भवत नाहीं.

**बाबू०**—माझ्या लौकिकावरही आपलं प्रेम नाहीं ?

**माणि०**—काय आहे असा आपला लौकिक ? ब्लँकचेक उपटणारा संभावित दरोडेखोर, हा मात्र आपला यापुढं लौकिक होईल.

**बाबू०**—समाज इतका मूर्ख नाहीं. तो मला डोक्यावर घेऊन नाचेल !

**माणि०**—दुर्दैवानं हेंच खरं होईल !

**बाबू०**—पटतं ना हें ? मग आजच्या समाजाशीं विसंगत असणाऱ्या प्रेमाच्या भावना कां उराशीं बाळगतेस ?

**माणि०**—मी एम. ए. झालेली आहें ह्मणून. माझं प्रेमही जमलेलं आहे. पूर्वीच प्रेमविवाह ठरवून मी बसले आहें.

**बाबू०**—त्या तुझ्या प्रियकराचं मला नांव सांगशील ?

**माणि०**—अनंत, अनंत, अनंत !

**बाबू०**—( खाडकन् मागें सरतो. ) माणिक, समाजावर केवढा अत्याचार हा ! माणिक, अनंत अक्करमाशी आहे ! बॅसटर्ड आहे ! व शिवाय गरीबही आहे.

**माणि०**—काय म्हणतां ?( मागें वळून जोरानें उद्गारते. )

**बाबू०**—तो व्यभिचारांतून जन्मलेला आहे ! इतकंच नव्हे ,तर त्याचा जन्मदाता कोण आहे हें तूं जाणतेस ?

**माणि०**—मला मुळींच जाणायची इच्छा नाहीं. तो बॅसटर्ड असला, तरी तुमच्यापेक्षां हजारपटीनं जास्त कुलीन आहे. कुलनत्वाचा आपला घमेंड व्यर्थ आहे.

**बाबू०**—तंही विद्वत्तेच्या घमेंडीवर जाऊं नकोस. तुमचे कारकून बिंदूकाका यांनाच विचार काय तें.

**माणि०**—काय, काय ह्मणतां ?

**बाबू०**—त्याहीपेक्षां पुढं जाऊन सांगतों, कीं प्रत्यक्ष नानासाहेबांनाच विचार !

**माणि०**—जबाबदारीनं बोला. विमानांतल्या गप्पा नकोत. ही हवा नव्हे, भूमी आहे. काय विचारूं नानासाहेबांना ?

**बाबू०**—कीं, अनंत हा आपला कोण ?

**माणि०**—काय, बोलतां काय ? बिनवासाची दारू तर नाहीं झोंकलीत ? कीं पोट्रोल झोंकून आला आहांत !

**बाबू०**—( खिशांतून पत्रें व फोटो दाखवतो ) ही अनंताची आई ! व हीं नानासाहेबांचीं तिला गेलेलीं पत्रं ! प्रेमळ कुमारिके! तूं आपल्या भावावरच प्रेम करून त्याच्याशीं विवाह लावणार ? पहा हा पेट्रोलचा भडका ! ( माणिक घेरी येत येत धाडकन् पडते. बाबूराव घोंटाळून जातो. पत्र व फोटो खिशांत कोंबतो, ) अरे बापरे ! पेट्रोल ह्मगतां ह्मणतां क्लोरोफॉर्म

ठरला! प्रेम. खरोखरच इचं अनंतावर विश्रब्ध प्रेम आहे एकूण ! नेव्हर माइंड. ( एकदां चेक पहातो. पत्रें व फोटो खिशांत आहे कीं नाहींत हें पाहून पाय न वाजतां जातो. )

**माणि०**—( मिनिटभरानें बसून, इकडे तिकडे पहात उभी राहून ) बेब-कूब, नीच, मांग, चांडाळ! बस्स झाला नानासाहेबांचा आश्रय! ( ज्योति येते. ) ज्योति. माझ्या छोट्या बॅगेंत दोन लुगडीं, दोन चोळया व पैशाचं पाकीट घेऊन ये शक्य तितक्या लौकर. जा जा. ( ती जाते. ) साऱ्यांना एक ध्यास! लोक काय ह्मणतील! लोक म्हणजे समाज, आणि समाजाचा पाया शोधूं गेलं तर एक द्रव्यलालसा, असत्य, दंभ, ढोंग, दास्यवृत्ति हेच त्या पायाचे दगड व त्यावरच उभा असणारा आमचा अन्यायांतला अन्यायी हा समाज! ( ज्योति येते. तिच्या हातांतून पेटी घेऊन निघते. ) आजपासून अनंताचं घर तेंच माझं घर. रात्रींही जर कुठं सूर्यप्रकाश असेल, तर तो अनंताच्याच घरात!

पद

**अधन गुणी गमत विनय लोकीं कान्त ॥ ध्रृ० ॥**
**धनमती गणी कुटिल भव महिभार ॥**
**ने सुख नाशा परिणय आशा ॥**
**विफल करी भाव नच सुखसार ॥ १ ॥**

[ माणिक जाते. ]

**ज्यो०**—अब गोविंदराव, अब बिदूकाका, अब नानासाहेब! ( गोविंद येतो. ]

**गोविं०**—माणिकताई कुठाहेत? ( बिंदूकाका येतात. )

**बिंदू०**—कुठाहेत माणिकताई? ( नानासाहेब येतात. )

**नाना०**—कां ग ओरडलीस?

**तिघे०**—माणिकताई कपड्यानिशीं कुठं तरी निघून गेल्या!

[ नानासाहेब आश्चर्यानें पहातात, ज्योति भीतीनें खालीं पहाते, बिंदू-काकांच्या चेहऱ्यावर आशा; गोविंदा ज्योतीकडे मिस्कीलपणानें पहातो. ]

—अंक पहिला समाप्त—

म. ग्रं. [illegible]
क्र. ९९७९ [illegible]
दि. ६।१२ [illegible]


अंक २ रा.

## प्रवेश पहिला.

( स्थळ:—कॅ. बाबूरावांचा दिवाणखाना. एक ऐटबाज टेबल, वाटोळया चार खुर्च्या, एक कोच, समोर लहान स्टूल्स, कपाट, टेलिफोन, सामानसुमान मात्र अव्यवस्थित व मारवाडो रंगाचें. पात्रें:-सर्जू पट्टेवाल्याच्या ड्रेसांत-ठाकठिकी करीत असतो. टेबलावर फळांच्या बशा वगैरे आणून ठेवतो.)

सर्जू—( स्व० ) रात्रीं १२ वाजेपर्यंत साहेबाची ददात नाहीं! चार तासांत घेतों गमती उरकून एकाद्या साहेबावाणी! ( कपाट उघडून ग्लासांतून पितो. ) जात इंग्लिश माल! दारू अशी प्यावी साहेब लोकानींच! ( सिगरेट ओढतो. ) साहेबांची भाषा बी फार गोड. ट्यूमी काय काया? ट्यूमो लय चांगला हाय! मेम लोकबी छान बोलतात-साजू ( खोल शिटीसारख्या आवाजांत ) किडर हाय ट्युम्! म्हंजी जसा फिडलचा ट्युम्! ( तारेवरून बोट फिरविल्याप्रमाणें करतो, इतक्यांत टेलिफोनची घंटा होते. ) अरे आलो घंटा! एका झकास नखरेवालोच्या चालीबोलीचा जवळून अनुभव घेतों आज! ( हॅलाव-हॅलाव! करून टेलिफोन मधून बोलतो. ) होय मीच कॅप्टन बाबूराव-निघाल्या ना यायला-ठीक-( टेलिफोन ठेवतो. ) आता बनावं साहेब! ओ यस्! पायलेट ड्रेस करावा. डोळे ढापणंही लावावीं, म्हंजी ओळखूही येणार नाहीं! ( कपाटांतून सर्व सामुग्री काढतो. एकीकडे इंग्रजी पद्धतीच्या गाण्याची शीळ घालीत असतो. पण हे पहिले कपडे? ठेवावेच अंगावर! ( कपडे अंगावर चढवूं लागतो. कांहीं उलटेच घालतो. ) होऊं द्याच पुरा रंग! ( परत पितो. ) वाचीत बसण्याची ऐट करावी. ( पुस्तक घेऊन वाचीत बसतो. ) पण जरा सेंट ही उडवावं! अंगावर, टेबलावर, खुर्च्यांवरसुद्धां सेंट उडवतो. ) आपल्या बाचा माल थोडाच आहे हा! ( परत वाचीत बसतो. इतक्यांत चंपू ऐन रुबाबानें यावी, तशी चंपूच्या ड्रेसांत ज्योति येते. तिनेंही डोळयांना काळे गॉगल्स लावलेले असतात. तोही तिच्याकडे

अगर तीही त्याच्याकडे डोळ्याला डोळा न मिडवितांच बोलतात. ) यावं प्यारी चंपा ! या चाफ्यावर लटका !

**ज्यो०**—आज किनई माझा घसा धरलाय. फार बोलवतंच नाहीं माझ्या-च्यानं.

**सर्जू**—बोलायला नकोच. प्रेम हें करून दाखवावं ! प्यारी, प्यारी ! मीच तुला प्रथम खाऊं घालतों. ( फळं हातांत घेऊन ) हें सफरचंद तुझ्या गाला-सारखं आहे ! तेंच मी प्रथम खातों. ( कडकडून चावा घेतो. ) घे आतां. ( तिच्या हातीं देतो. )

**ज्यो०**—( स्व० ) अग बया ग ! गालबील तर न्हाईना चावणार हे ! ( उ० ) छान !

**सर्जू**—हे पेरु ! लहान पोरांनीं खावे ! तूर्त झांकून ठेवा. ( टेबलावर परत नेऊन ठेवतो. )

**ज्यो०**—हातसुद्धां लावूं नका त्यांना. ( स्व० ) लइच डांबिस हाइत हे !

**सर्जू**—हीं पपनसं. राहूं देत दूरच. मागून पाहूं. ( परत ठेवतो. )

**ज्यो०**—मला नकोच कांहीं खायला. तुमचं प्रेम—

**सर्जू**—आस्ते कदम. येतोंच त्यावर ! ही टोमॅटोची फेस ! ( तिच्यापुढें करतो. ती लाजून मुरका मारते. ) अधरासारखी चुंबनीय आहे अगदीं !

**ज्यो०**—दूर असा ना ! मला अगदीं भीति वाटते बाई आपली.

**सर्जू**—दूरची हुरहूर दूर राहूं दे. तूं मी नजिक ह्मणजे अगदीं इंग्रजी म्यजिक ! ( जवळ जातो. )

**ज्यो०**—जवळ येऊं नका. मला अगदीं कसंसंच होईल !

**सर्जू**—विमानांतला ड्रेस हा ! या ड्रेसानं मनुष्य हवेंतच उडूं लागतो. विमानांत बसल्यावर पहावं तिकडे हवा ! तुझे हात हेंच विमानाचें हॅंडिल ! तुझे डोळे हाच विमानाचा फ्लॅश लाइट ! तुझा पदर हाच विमानाचा पंखा ! तुझे पाय हे विमानाचे प्रापेलर्स ! आणखी किती तरी जागा बोट ठेवून सांग-ण्यासारख्या आहेत प्यारी चंपू !

**ज्यो०**—त्यापेक्षां मजजवळ विवाहाचं कांहीं तरी बोला !

सर्जू—विवाह तर करीनच तुझ्याबरोबर. पण–पण-(स्व०) काय बरं तो पांढरपेशांचा शब्द–वासोत्तरं–सहवासोत्तर (उ०) तो पण सहवासोत्तर प्रेम–विवाह करीन! सहवास प्रथम वाटेल तितकं सहवासोत्तर प्रेम करावं, पण मात्र लग्न एकीबरोबरच!

ज्यो०—तुमची पहिली एक ठरलेली आहे ना गडे?

सर्जू—ती मीं नाकारली. तूंच खरी यापुढें नियोजित वधू!

ज्यो०—तुमचा सर्जू-तो! त्याचंही लग्न ठरलं आहे म्हणे ज्योतीशीं!—

(धाडकन बाबूराव येतो.)

बाबू०—(स्व०) हा कोण व ही कोण? (सर्जू कपड्यानिशीं पळ काढतो.) (उ०) आपण–आपण–

ज्यो०—मी आपली चंपूताई!

बाबू०—आपण कुणाबरोबर इथं होतांत?

ज्यो०—मला ते वाटलं तर आपणच!

बाबू०—(इकडे तिकडे पाहून) म्हणजे माझ्या घरांत कुणी चोर तर शिरला नव्हता? इथं तुम्हांला सर्जू नाहीं दिसला?

ज्यो०—नाहीं!

बाबू०—कांहीं तरी घोंटाळा झाला खास! करूं त्याची सावकाश चौकशी. मिस् चंपू, माणिकऐवजीं तूंच नानासाहेबांची मुलगी असायला पाहिजे होतीस!—

ज्यो०—(स्व०) म्हंजी हें काय? बायकोचा नवरा नसून बायकांचा पुरुष दिसतोय हा!

बाबू०—बोलत कां नाहींस लाडके! डू अलॉव मी टू कोर्ट यू.

ज्यो०—(स्व०) कोर्टाची काय भाषा काढली यानं?

बाबू०—कम ऑन डिअर–(तिचा हात धरतो. ती हिसकावते. तिच्या पाठीमागून हात वळवतो. तोंच चंपू येते, व दारांतच थबकते. बाबूराव व ज्योति आश्चर्यानें व भीतीनें दूरदूर जाऊन चंपूकडे टक लावून पहातात.)

चंपू—कोण ज्योति? अस्सं का? कॅप्टनसाहेब, हवेंत फिरतां फिरतां चंद्रज्योतिपर्यंत मजल मारलीत कीं!

बाबू०—आय मसनट् बी काऊड डाऊन ( उ० ) चालायचंच. थोरामोठ्यांच्या रात्रींकडे कुणींही पाहूं नये.

चंपू—ज्योति, हा काय पांचटपणा ?

ज्यो०—आन् आपुन या वखताला आंदी कां येणं केलं ?

चंपू—( स्व० ) मोलकरणीच्या तोंडाला लागण्यापेक्षां आपणच रंगावर घ्यावं. ( उ० ) हां हां हां ! सर्जूला पाहायला आलीस होय ?

ज्यो०—अलवत् ! माझं त्यांचं लग्न ठरलं हाई ! ( जातें. )

बाबू०—आपणही या वेळीं निघून जाल तर फार बरं होईल ! ( अनंत येतो. )

अनं०—नानासाहेबांनीं माणिककरितां तयार केलेल्या आंबोणाचा नकळत चट्टामट्टा करूं पहातेस ? पाजी पोरी, प्रथम घरचा रस्ता धर. नीघ !

चंपू—अनंत, अनंत ! मी ईश्वरसाक्ष निष्पाप आहें. श्रीमान् नवरा मिळवावा ह्मणून तर मी इथवर आलें ! मी काय–इतर पोरींसारखी पोर इथवर आलें, पण पुरीपुरी फसली जात आहें. तुमच्या पायां पडतें. मजबद्दल गैरसमज करून घेऊं नका. विचार करा.

अनं०—हें खरं असेल, तर तूं निर्दोष आहेस. जा. ( ती जाते.) बाबूराव, बाबूराव ! या पुढील पांच मिनिटें माझ्याशीं माणसाप्रमाणं वागा. आपण माणिकजवळ केलेल्या विधानांना पाठिंबा देणारी सामग्री आपणाजवळ आहे असं समजतं. दाखवाल का मला ती ?

बाबू०—हुं हुं हुं हुं ! ती सामग्री पाहून आपली व्यभिचारी जन्मकहाणी आपण थोडीच दुरुस्त करूं शकणार आहां ?

अनंत—मला सत्याची चाड आहे. आपण केलेल्या विधानांमागं सत्य आहे कीं काय, हेंच मला पहायचं आहे व तें मी याच बैठकींत पहाणार. आहें.

बाबू०—पहाणार ! वैमानिक खातं नेमळ्या नपूंसकांकडून नांवारूपास येणारं नसतं–पहाणार !

अनंत—बाबूराव, वैमानिकाची आपली घमेंड कीरपक्ष्यांच्या हवेंत चालवावी. या भूमीवर बुद्धि अगर मनगटाच्या सामर्थ्यांचंच चीज होत असतं.

मला जे कागद पहायचे आहेत, ते तुमच्या खिशांत असून ते मी असे पहा-णार—( त्याचा हात पकडून सफाईनं तिडा देतो. )

बाबू०—प्लीज लीव्ह मी ऑफ. ( अनंत सोडतो. )

अनंत—प्रथम माणुसकीची आपणाला याद करून दिली होती, ती याकरतांच !

बाबू०—( कागद व फोटो अनंताच्या हातीं देतो. ) नीट पहा व माझ्या हवालीं कर आणि तडक चालता हो. नाहीं तर भयंकर प्रसंग ओढवेल. ( अनंत लक्षच देत नाहीं. )

अनंत—हीं पत्रं नानासाहेबांनीं पाठविलेलीं आहेत एकूण !

बाबू०—हा फोटोही नानासाहेबांनींच काढवून घेतला असेल ?

अनंत—बदमाष माणसा, चूप बैस ! दीड दमडीच्या कारकुंड्यानं पुरावा ह्मणून दिलेल्या कागदपत्रांना निर्णायक समजून तूं दोन प्रेमी जीवांची राख-रांगोळीं करूं पहातोस ! ( टेलिफोनजवळ जाऊन—' हॅलाव-हॅलाव-नंबर १११२'थांबून ' कोण बिंदूकाका ? मी अनंत—कॅप्टन बाबूरावांच्या दिवाणखा न्यांतून बोलत आहें—उठव नानासाहेबांना—ताबडतोब रवाना कर फोनवर—मी वाट पहात आहें. जर कसूर केलीस तर याद राख—अनंताशीं गांठ आहे.' नानासाहेब-तुह्मीच आलेत—ठीक—माझ्या आईनं तुह्मांला पाठविलेलीं पत्रं—असतील नसतील तीं—व तुमचींही तिला गेलेलीं अर्शी तिनं परत केलेलीं—अशांसह असाल तसे कॅप्टन बाबूरावांकडे निघून या ' (टेलिफोन ठेवतो. )

बाबू०—माझं घर म्हणजे चवाठा आहे वाटतं चार लोक जमायला ?

अनंत—चवाठा ? कांहीं वेळानं हें घर कदाचित पागलखानाही बनेल बाबूराव ! तुमच्यासारख्यांनीं नानासाहेबांसारख्यांच्या मदतीनं तीच स्थिति केली आहे आमच्या समाजाची.

बाबू०—नानासाहेबच आहेत त्याला जबाबदार ! ते व तुम्ही पाहून घ्या.

अनंत—आणि आपण ? माझ्यासारख्या अकरमाशांची निपज करण्याचे चोरटे कारखाने काढा.

बाबू०—बॅसटर्ड म्हणवून घेण्यांत तुला कांहींच वाटत नाहीं ?

अनंत—मला काय वाटायचं ? कुणाही मुलाइतकाच मी निष्पापपणानं जन्म घेतला आहे. विवाहाशिवाय जन्म देणारे तेच खरे अकरमाशी! पण उलट्या समाजांत त्यांच्या व्याख्याही उलट्याच असायच्या. ( कागदपत्रें व फोटो आंतल्या खिशांत ठेवतो. )

बाबू—कागदपत्रें खिशांत कोंबण्याइतका उलटलास का ?

अनंत—तुझ्यापेक्षां त्यांच्याशीं माझा निकटसंबंध आहे बरं बाबूराव !

बाबू०—मग माझ्या विधानांची वाट ?

अनंत—जरूर त्या वेळीं कोर्टांत लागेल.

बाबू०—मी निःशस्त्र आहें असं समजूं नकोस !

अनंत—सत्यापुढं शस्त्र हें कस्पटासमान आहे. याचा नुकताच निर्णय झाला आहे.

बाबू०—बऱ्या बोलानं खिशांतले कागदपत्र माझ्या हवालीं कर, व वाट धर. ( कपाटांतून पिस्तुल आणतो. )

अनंत—माझ्या हृदयाचा पोलादी पीळ इतका प्रखर आहे, कीं तुझ्या टीचभर पिस्तुलांतील सहा गोळ्या तो सहज पचवूं शकेल! नीति-धैर्य असेल, तर उडव गोळी. हा पहा तुझ्यासमोर मी उभा आहें ! ( बाबूराव पिस्तुल सरसावणार तोंच नानासाहेब येतात. किंचित् हाहाःकार होतो. )

नाना०—पाहूं तें पिस्तुल ! ( बाबूराव त्यांच्य हातीं देतो. ते त्यांतील गोळ्या काढून टाकतात. ) इतक्या विकोपाला गोष्टी जाव्यात ?

बाबू०—प्रेमांतली तेढ याहूनही भयंकर प्रसंग आणते.

अनंत—नानासाहेब, नानासाहेब ! मी अकरमाशी ठरलों, तर त्याबद्दल मला यत्किंचितही खेद वाटणार नाहीं. पण—पण—माझं जन्मदातृत्व जर आपणांकडे जाणार असेल तर मात्र माणिकच्या होणाऱ्या निबिड निराशेनं माझं जीवनही गोठून जाईल ! नानासाहेब, खरं खरं काय तें सांगा—मी खरोखरच आपला पुत्र—माणिकचा भाऊ—

नाना०—काय म्हणतोस तूं हें ? तुझं माथं तर नाहीं फिरलं ?

अनंत—( पत्रें व फोटो दाखवितो. ) हीं पत्रें पहा. हा फोटो पहा. आपणांला तिनं काय उत्तरं पाठविलीं ? ती निर्दोष आहे ना ? नानासाहेब, माझी आई निर्दोष आहे ना ?

**नाना०**—निर्दोष आहे. मात्र हीं पत्रं खरींच मी लिहिलीं—तीं निव्वळ तारुण्यदोषानं लिहिलीं गेलीं—पण ती माऊली जगांतील श्रेष्ठ माउलीइतकीच निर्दोष आहे. हें पहा, हें एकच मला आलेलं तिचं शेवटचं पत्र– ( अनंताच्या हातीं पत्र देतो. )

**अनंत**—( मोठ्यानें वांचतो ) सा० न० वि०—माझे मृत पति आपले जिग्गर दोस्त होते ! त्या आदरामुळंच आजपर्यंत मी गप्प बसलें. अनंताच्या जन्माबरोबरच माझा संसार पुरा झाला आहे इहलोकावरील माझं प्रेम माझ्या पतींच्या निधनाबरोबरच जळालं. मी आपलीं पत्रं परत करीत आहे. माझा फोटो—माझं लग्न ठरविण्यापूर्वी काढलेला होता—तोही शक्य तर परत पाठवा. माझ्या लग्नापूर्वी आपण केवळ गरीब असल्यामुळें मला आपणाकडे दिली नाहीं. आपल्या मुलीच्या बाबतींत गरीब–श्रीमंतीचा विचार न करतां तिजवर प्रेम करणाऱ्याला जांवई करून घ्याल, तरच आपणाला आपलं गत–जीवित समजलं असं मी समजेन. मी जिवंत असलें तर माझ्या अनंताला तोच धडा गिरवायला सांगेन. यापुढं पत्रं पाठवूं नका. वाचणार नाहीं.

ता० ११।१२।१९०४ पार्वती.

आहाहा ! माझी आई ! आई, तूं जिवंत असल्याचा खरा ब्रह्मानंद मला या वेळीं होत आहे ! ( पत्र छातीवर चेपतो ) नानासाहेब, हें पत्र मला द्या. हा पवित्रांतील पवित्र जीवोल्लेख आहे !

**नाना०**—ठेव पाहिजे तर. पण अनंत माणिक कुठं आहे ?

**अनंत**—माझ्या आईच्या सान्निध्यांत !

**बाबूराव**—आणि ती काय म्हणून ?

**अनंत**—त्याचं उत्तर तीच देईल !

**नाना०**—खबरदार तिची तरफदारी करशील तर. मलत्याच प्रेमाला मलताच पाठिंबा देऊं नको. तिचं लग्नही त्यांत मुकर झालं आहे !

अनंत—विवाहित स्त्रीलाही प्रेम–पत्रं पाठविण्याच्या बुद्धकी सत्तेला कस्पटाचीही किंमत नाहीं. आपण नुसतं समाज समाज म्हणत रहावं, व आंतून समाजाच्या मर्मावर वाटेल तसे चोरटे आघात करावेत ! तुमच्याबद्दल गैरसमज फैलावून बाबूरावांकरवीं चंपू उजवून घ्यावी, म्हणून या प्रेमपत्रांचा विदूकाकांनीं उपयोग करावा ! माझ्याबद्दलचा गैरसमज माणिकच्या मनांत भरवून देण्याकरतां त्याच प्रेमपत्रांचा आधार बाबूरावांनीं घ्यावा ! आणि मी मात्र, तुमचीं हीं कुलंगडीं चव्हाठ्यावर न आणतां निर्मल माणिकच्या प्रेमावर या हलकटासाठीं लाथ मारायला तयार व्हावं ! नानासाहेब, धन्य आहे तुमचा विवेक व धन्य आहे तुमची शिष्टाई !

नाना०—बाबूराव आपण अगदीं घोडचूक केलीत !

बाबूराव—नानासाहेब, माणिकला ढिली सोडण्यांत आपण अनंत अपराध केलेत !

अनंत—आणि या समाजछद्मूच्या हातीं ब्लॅंक चेक देण्यांत तर नानासाहेब, आपण आत्महत्याच करून घेतलीत !

बाबूराव—( स्व० ) कुठं बरं ठेवला मी तो ब्लॅंक चेक. ( थरारून ) माझ्या पायलट सूटच्या आंतल्या खिशांत ! तो पायलट सूट–( उ० ) नानासाहेब, त्या ब्लॅंक चेकबद्दल व बिथ्राटलबद्दल लिहा पाहूं टाइम्सला पत्र ! लिहितां ना ? [ जातो ]

अनंत—प्रथम ललाटलेखक विधात्याकडे एक पत्र रवाना करा !

पद

ने विलया सारा भ्रम खरा ॥
करनी स्फोट हा कृती नव थरा ॥
शुभद काल नव गमत सुखाचा ॥
उदया ये हा मोदें प्रिय खरा ॥ १ ॥

( जातो. )

नाना०—झालं हें सारं गळ्यांत आलं ! केलं तें सारं उलट झालं ?

[ जातात ]

## प्रवेश दुसरा

( अनंताचे घरांतील छोटेखानी दिवाणखाना. पुस्तकांचीं कपाटें, टेबलावर फुलांच्या कुंड्या, एका टेबलावर बरेंचसें लेखनसाहित्य. खुर्च्या साध्या; व कांहीं कापडी. इझिचेअर्स. खुंट्यांना लोंबते कपडे, क्रिकेट बॅट, टेनिस रॅकेट वगैरेही खुंट्यानांच अडकविलेली. )

**अनंत**—( एक चिठ्ठी वाचून, स्वगत- ) काल रात्रीं नानासाहेब आपल्या बंगल्यांतही न जातां परस्पर बिदूकाकाकडेच राहिले, याचा अर्थ, माणिकच्या गृहत्यागामुळं त्यांना अत्यंत दुःख झालं असावं, असाच असला पाहिजे. एकूण नानासाहेबांना प्रेम ह्मणजे काय हें थोडं फार कळतं तर! विचारूं का आईला ( मरून येऊन ) नानासाहेबांच्या या प्रेम-भावनेवर आई किती तरी चांगला प्रकाश पाडील! ( उघड ) आई ग! ए आई-आई-

**पार्वती**—( आंतूनच बोलते. ) काय बरं बाळ ?

**अनंत**—माणिक आहे का तिथें ?

**पार्वती**—ती पाणघरांत आहे. येईल इतक्यांत बरं!

**अनंत**—मला एक कहाणी ऐकायची आहे तुझ्या जवळून! मीच येऊं का तिकडे ?

**पार्वती**—मीच आलें हं! ( थोडया वेळानें एक शुभ्र पातळ-चोळी नेसलेली, साधारण वयानें ४५ ची, जुन्या काळची सुशिक्षित बाई येते. )

**अनंत**—बैस इथं. ( ती ज्या खुर्चीवर बसते तिथें जवळच तो खालीं तिच्या पायांजवळ बसतो. ) हीं पहा पत्र-पाहिलींस ? ( तिच्या पायांवर हात ठेवून ) मला सांग बरं, ती तुझ्या लग्नापूर्वीची गोड कहाणी. ती मला नानासाहेबांनीं अर्धवट सांगितली आहे. सांग पाहूं!

**पार्वती**—( किंचित् हंसून ) चल वेडा कुठला! त्यांत काय ऐकायचं ?

**अनंत**—काय ह्मणजे! प्रेमाची कथा केव्हांही ऐकावीशीच वाटते. माणिक, माणिक, झटकन् ये पाहूं इकडे.

माणि.—( आंतूनच ) पटकन् आलें हं एवढं, कुंकूं लावून. ( न्हाऊन आल्यामुळें केंस मोकळेच असतात अशी केशरी पातळ व केशरी ब्लाऊज परिधान केलेली अशी माणिक येते. ) हास्याच्या मृदु रेषा का नाचताहेत इतक्या उच्छृंखलपणानं ! ( तीही कुशाम्यावर दुसऱ्या बाजूला बसते. ) आई, आई ! कसलं वेड घेतलं आहे अनंतानं आज ! ( हांसते )

अनंत—चूप ! आई सांगेल तें ऐक. आई, नानासाहेबांची मागणी कां ग फेंटाळली तुझ्या त्या श्रीमान् वडिलांनीं ?

पार्वती—नानासाहेब त्या वेळीं गरीब होते म्हणून ! मी तर त्या वेळीं अवघी १२ वर्षांची. तुझे वडील मात्र पूर्वींपासूनच श्रीमंत; पण नानांचे दोस्त. नानांनीं प्रथम माझ्या वडिलांजवळ किती तरी छान बुद्धिवाद केला. पण वडील म्हणून वळत ना नानासाहेबांना नंतर त्यामुळं फार फार यातना झाल्या. दोन वर्षं त्यांनीं मटकून काढलीं. पुढं ते मामलेदार झाले, नंतर होत होतां कलेक्टरच्या हुद्यापर्यंत चढले. ती गोष्ट निराळी. असशील तेव्हां तूं फार तर पांच वर्षांची. तूं अनंता तेव्हां चांगला ६।७ वर्षांचा असशील, इकडच्या दुखण्यांतही नानासाहेबांनीं पराकाष्ठा केली होती हो ( ती भरून येते ) त्यानंतर वर्षभरच काय ती माणिकची आई होती !

अनंत—नानासाहेबांनीं पहिलं पत्र तुला केव्हां धाडलं ?

पार्वती—त्यानंतर दोन वर्षांनीं !

माणिक—त्यांचं तुमच्यावर खरंच प्रेम होतं का ?

पार्वती—पत्रावरून तरी मला वाटलं, व अजूनही तसंच वाटतंय.

माणिक—अजूनही तसंच आहे मात्र–दे पाहूं तीं पत्रं ( घेते व चाळते )

अनंत—काय पाठ करतेस कीं काय ?

माणिक—त्यांतले कांहीं विशिष्ट शब्द नानासाहेबांवरच मला फेंकायचे आहेत वेळ आली कीं !

पार्वती—पहा बाई विचार करून. आधींच नानासाहेब खवळले असतील–

अनंत—पण दुःखानंही तितकेच गोठून गेले आहेत !

**माणिक**—कशावरून म्हणतोस तूं ?

**अनंत**—ज्या अर्थी आपल्या बंगल्यांत त्यांनीं पाऊलही टाकलं नाहीं, त्या अर्थी—

**माणिक**—कदाचित् तो त्यांचा आग्रही असेल ! ते अतिशय हेकट आहेत. सत्यसंकल्पित अशा प्रेमाचा मार्गही इतका असिधारामय कां व्हावा, हेंच समजत नाहीं.

**अनंत**—समाज शक्य तितका कृत्रिम झाला आहे म्हणून. ( इतक्यांत एक हिंदी पोलीस ऑफीसर येतो. )

**पार्वती**—तें कोण आलं पहा. ( जाते. )

**अनंत**—( न उठतांच ) काय पाहिजे आपल्याला ?

**पो० ऑ०**—इथं माणिकताई आहेत ?

**माणिक**—आहेत.

**पो० ऑ०**—आपल्या बाबतींत कॅप्टन बाबुरावांकडून आमच्या स्टेशनवर गुन्ह्याची नोंद झाली आहे. आपलं म्हणणं मला लिहून घ्यायचं आहे.

**माणिक**—विचारा मला.

**पो० ऑ०**—कुणीं अनंतरावानं आपणाला फसवून नेलं—

**माणिक**—मी चांगली सज्ञान आहें; एम्. ए. आहें. मी आपण होऊनच वडिलांचं घर सोडून इथं आलें आहें. झाला खुलासा ?

**पो० ऑ०**—बाबूरावांचं आपणांबरोबर लग्न ठरलं आहे ?

**माणिक**—नाहीं. ( पोलिस ऑफिसर लिहून घेतो. )

**पो० ऑ०**—ठीक ठीक ठीक ! बरोबर आहे. एकुण खोटी वर्दी दिली कॅप्टनसाहेबांनीं ! आतां हें साऱ्या वर्तमानपत्रांत जाहीर होणार ! काय पण असतात एकेक लोक ? येतो हां. माफ करा थोडी तसदी दिल्याबद्दल. (जातो.)

**अनंत**—सी. आय. डींत याचा रिपोर्ट जाऊन कॅप्टन बाबूरावांच्या नोकरीवर परिणाम झाला नाहीं म्हणजे पुरे.

माणिक—इतका का त्याच्या नोकरीचा पान्हा आला आपल्याला ?

अनंत—ते तुझे नवरे म्हणून !

माणिक—हां, वारे वा ! त्यांची नाहीं हां कुणी खोडी काढायची !

अनंत—खोडी ? चांगला खोड्यांत अडकवतों त्याला. इंडियन पीनल कोडांत डिफिकेमेशनचा एक आ करून बसलेला सेक्शन आहे—

माणिक—मला वाटतं, या पत्रांचा आणखीही एक उपयोग करून घेतां येईल. या पत्रांत दिसून येणाऱ्या नानासाहेबांच्या एका काळच्या प्रेमतंतूवर जर खुबीनं बोट फिरवलं, तर आपल्या प्रेमाला पोषक असा मनोहर नाद त्यांतून निघूं शकेल.

अनंत—खरंच का आपलं प्रेम आहे ? ( कुठं तरी पाहून )

माणिक—अक्षय, अमर असं स्त्रीचं हृदय–त्याची दुर्बलता, विश्रांति, विनय, आशा, आकांक्षा-प्रत्येक असेल नसेल त्या भावनेसह–कधींच तुझ्या हृदयस्थ अनंतांत विलीन करून टाकलं आहे. अनंत, यौवनगंगेच्या तीरावरून पार होण्याकरतां हा बहिरंगाचा देहही तुझ्याच दारीं आणून ओतला, तरीही वेड्या, खरंच का प्रेम आहे म्हणून विचारतोस ?

पद

माझा प्रेमदेव भोळा ॥
निज हृदयीं स्थापिला ॥ धृ० ॥
ज्याची पदरीं ही दासी देवा ॥
विसर कधीं ना माझा ॥ १ ॥

अनंत—प्रतिक्षणांतील शंकावृत्ती ही प्रेमाची उत्कंठाच वर्तविणारी असते. या दारिद्र्याच्या अरुंद दरवाज्यांत तुझ्या हृदयवैभवाचा महिमा नत झाला असंही मला वाटतं. पण उषःकालच्या पहिल्या आनंदकिरणानं आतां मी धुवून निघालों आहें. तुला नाहीं असं वाटत ?

माणिक—ल्हानपणापासूनच मी तृणदलाप्रमाणं या अनंताच्या कलत्या प्रकाशांत डोलत आहें. याची तुला कल्पनाही नाहीं एकूण ?

अनंत—कशी कल्पना असणार ? श्रीमंताच्या सुशिक्षित मुली माझ्यासारख्या मध्यम स्थितींतल्या माणसावर प्रेम करूं शकतील असं कसं कुणाला वाटेल !

माणिक—तुझा हा विनय जळजळीत शिखेप्रमाणें माझ्या अंगाला झोंबत आहे. अजूनही तूं इतका विनयशील असावास ! अनंत, अनंत ! लोलुप ओंठाच्या पहिल्या सुखमीलनात प्रेमाच्या स्वप्न-जन्माला कायमचं जागं कर. ( तीं दोघेंही जवळ जवळ येतात, तोंच नानासाहेब येतात. )

नाना०—माणिक, तूं घर सोडून इथं येऊन राहिलीस ! आतां लोक काय म्हणतील याचा विचार केलास का ? तिकडे त्या गाढवानं—गाढवच तो बाबूराव ! जांवई झाला म्हणून काय झालं !—पोलिसांत वर्दी देऊन टाकली. माणिक, माणिक ! चल माझ्याबरोबर ! तुझं हृदय माझ्याकरतां जराही द्रवत नाहीं का ?

माणिक—अनंत आज ज्या अवस्थेंत आहे, त्याच अवस्थेंत आपणहि एका काळीं होतांत ?

नाना०—होय, मीही एका काळीं गरीब होतों.

माणिक—केवळ आपल्या गरीबीमुळं, अनंताच्या आईचा आपणाशीं विवाह करण्याचं तिच्या वडिलांनीं नाकारलं हें खरं ना ?

अनंत—त्यामुळं आपली जो मनःस्थिति झाली, त्याच मनःस्थितींत आपण मला कां ढकलतां ? ( ज्योती येते. )

ज्योति—नानासाब, नानासाब ! गेल्या महिन्याचा द्या माझा पगार कृपा करून. लगीन लावूनशान याम्होरं मला संसार थाटायचा हाय !

नाना०—कुणाशीं लग्न लावणार तूं ?

ज्योति—सर्जेरावाशीं ! कालपासून ते फरारी झाईत म्हून माझं ध्यान बी न्हाई लागत कामधंद्यावर ! आतां पगार दिलात तर सारं शहर हिंडून त्यांना हुडकीन. लगीन करून त्यांना कसं अगदीं मायेनं नांदवीन.

नाना०—( स्व० ) खालच्या जातींतही प्रेमाचं स्वरूप इतकं उत्कट असतं तर ! ( उ० ) घे ही नोट. ( १० ची नोट देतात. )

ज्योति—जी नानासाब !—नानासाब, नानासाब ! तुमच्या पायां पडतें, पण ताईसाहेबांस्नी बाबूरावांना देऊं नका. माईवासारख्या मोलकरणीजवळची पांचटपणा करायला त्यांनीं कमी केलं नाहीं ? देवाशपथ सांगतें—

नाना०—देवाशपथ सांगतेस ?

ज्योति—जी ! इतकंच काय तर चंपूताईलाही त्यांनीं अद्दल घडविली-त्यांचावी निरवाळा घ्या, जातें मी. ( जाते. )

अनंत—नानासाहेब, ज्योतीनं कांहींच सुचवलं नाहीं का आपणाला ?

नाना०—करायचं तर विचार करण्यासारखं आहे.

माणिक—निदान आपण आपल्या पूर्वकालचा काळ आठवा ! वस्तुस्थितीची तुलना करा !

नाना०—तो काळ निराळा, हा काळ निराळा.

अनंत—पण मानवी स्वभाव त्रिकाळ एकच असतो ना ?

नाना०—( स्व. ) हेच शब्द मी एका वेळीं बोलत होतों ( उ. ) तरी पण—

अनंत—असं करूं नका. त्या वेळीं आपण एकटेच दुःखी झालांत, पण आज—आज तीन हृदयं दुभांगत आहेत, आणि तींसुद्धां एका पाजी माणसाखातर !

नाना०—तीन कोण ?

माणिक—यांची आई, ही व मी.

नाना०—( शहारून ) पण मी आतां लग्नही ठरवून मोकळा झालों ना !

माणिक—काय घेऊन बसलांत हें ! नानासाहेब, निदान आपल्याला पार्वतीबाईबद्दल अद्याप काय वाटतं ?

नाना०—प्रेमपूर्ण आदर !

माणिक—मग हें त्यांचंच शेवटचं पत्र पहांना ! त्यांनीं त्यांत काय इच्छा व्यक्त केली आहे ही शेवटीं—( पत्र देते. )

नाना०—' आपल्या मुलीच्या बाबतींत गरिबश्रीमंतीचा विचार न करतां तिजवर प्रेम करणाऱ्याला जांवई करून घ्याल, तरच आपल्याला आपलं गतजीवित समजलं अस्सं मी समजेन ( नानासाहेब गहिंवरतात. )

पार्वती—( आंतून–'अनंत, माणिक, कुणाजवळ त्या पत्राबद्दल बोलताहांत'? )

नाना०—मी नानासाहेब–याल का जरा इकडे ? ( पार्वतीबाई येतात. नानासाहेब उभे रहातात. )

पार्वती—प्रमलगार का गत–जीवित ?

नाना०—गेल्या २५ वर्षांनंतर हीं वाक्यं मला आजही नवाच अनुभव मिळवून देत आहेत. किती कळकळीची भावना ही ! ( परत पत्र पहातो. )

अनंत—इतिहासाची पुनरुक्ति होते म्हणतात—

पार्वती—चूप अनंत ! नानासाहेब, आपण गरिबाचे श्रीमंत झालांत, तसा अनंतही गरिबाचा श्रीमंत होईल. प्रेमाचं पाठबळ नसतांनाही जर आपण वर येऊं शकालांत, तर माणिकसारख्या प्रेमपुतळीच्या साहाय्यानं माझा अनंत अवघ्या विश्वांतली संपत्ति तुम्हांसमोर आणून ओतील !

नाना०—( स्व. ) हेंही माझंच वाक्य ही बोलली. ( उ. ) पार्वती, हीं दोन्ही मुलं तुझींच आहेत. तूं मला केलेली आज्ञा २५ वर्षांनंतर मी पुरी करतों. माणिक, सोडला तुझ्या लग्नाचा हेका ! लोक कांहींही म्हणोत ! स्वतःच्या जागृत झालेल्या ताज्या अनुभवानं सांगतों, कीं प्रेम हेंच इहलोकींचं अमर आहे ! ( चंपू येते. )

चंपू०—नानासाहेब, ( त्यांचे पाय धरून ) नानासाहेब! मला मुलगी मानली असं म्हणा, तरच पाय सोडीन !

नाना०—( तिला पोटाशीं धरून ) डरो मत बेटा ! यापुढं तूंच माणिकची जागा घे. ती पाहिलीस माणिक ! अनंताशीं प्रेमबद्ध होऊन मला म्हाताऱ्याला दुरावत चालली आहे ! ( बाबूराव येतात. )

अनं०—( बाबूरावाजवळ टिचकी वाजवीत जातो. ) चल. ब्लँक चेक काढ प्रथम !

बाबू०—तूं कोण मागणार ?

नाना०—मींच त्याला सांगितलं आहे मागून घ्यायला !

बाबू०—अस्सं ! ब्लँक चेक असे परत मिळत नसतात !

अनं०—तुझ्या उरावर डिफिमेशनची फिर्याद लटकत असतांना तूं सुटलास असं समजूं नकोस. तीस हजारांच्या दुप्पट पैसे वाजवून घेईन, तरच नांवाचा अनंत !

बाबू०—(स्व.) डिफिमेशनच्या खटल्यांत इतकी नुकसानी अंगलट येते ? अरे बापरे ! जवळ जवळ साडेतीन वर्षांचा पगार ! ( उ. ) माणिकवरचा हक्क सोडून दिला तर ! ( वैमानिक ड्रेस खाकोटीस असा सर्जू व ज्योति येतात.

सर्जू—नानासाहेब ! या कपडयात, हा तुमच्या सहीचा चेक आहे !

बबूराव—आण तो इकडे ! तो माझा आहे.

सर्जू—ठेवलाय तुझ्या बापानं ! घ्या नानासाहेब हा-(त्यांच्या हातीं देतो ) लग्न लावून दोन दिवसीं येतों वघा तुमच्या पायां पडायला ! ( वैमानिकाचे कपडे बाबूरावाच्या आंगावर फेंकतो. ) घे हीं तुझीं फटकुरं ! नाहीं घेत ! गेलास उडत ! ( ज्योतीसह जातो. )

पार्वती—पैशाचा मोह सोडून गरिबाचा कैवार घेतला, कीं नष्ट झालेलं धनही अस्सं चालून येतं ! पैशाच्या मोहांत गुरफटणाऱ्याची संपत्ति हातोहात नाहींशी होते असा जगांतला अनुभव आहे. ( तोंच एक पट्टेवाला लखोटा घेऊन येतो. )

अनंत—( तो लखोटा घेऊन फोडतो. ) कॅप्टन बाबूराव इज ऑर्डर टू रिझाइन् हिज ऑफीस वुइदिन ट्वेन्टीफोर अवर्स, फॉर वॉन्ट ऑफ हिज सोब्रिसिटि कॅरेक्टर ॲन्ड जनरल इफिशियन्सी.

बाय ऑर्डर ऑफ

हिज एक्सलन्सी, दि कमांडर इन् चीफ

बाबूराव( लखोटा त्याच्या हातांतून ओढून घेतो, वाचतो व चुरगळून टाकतो. स्वगत- ) भेटेल त्या माणसानं मला गरगर फिरवून अखेर हवेंत उडवलं ! खराच गेलों उडून, पण लोक काय म्हणतील ? ( जातो. ) ( अनंत व माणिक त्याच्या जाण्याकडे पहातात व पुन्हां एकमेकांकडे पाहूं लागतात आणि हांसतात. )

पार्वती—चल चंपू घरांत, आपण चहा करूं सर्वांना. ( चंपू व पार्वती जातात. )

**नाना०**—मीही येतोंच. पुढच्या गोष्टी इथंच आपण मुक्रर करूं. ( तो, अनंत व माणिककडे पहातो. पण तीं कुठंतरीच पहातात. हांसत असतात.—जातो.— )

**अनंत**—ती पाहिलीस मेघावरची सोनेरी छटा !

**माणिक**—तो पाहिलांत अनंताचा दरवळणारा सुगंध !

**अनंत**—तुझ्या देहाच्या शोभेवर केवढा हा हृदयाचा प्रकाश पडला आहे पहा !

पद.

**हो योग शुभ साधूनी प्रेमें । सुरस पाना करूं ॥ १ ॥**
**दिल दिला लाहिला । प्रेमासी प्रेमें ॥**
**मन प्रमोदें भरोनी । भव हा सुखें करूं ॥ १ ॥**

**माणिक**—पण, तुझ्या मुख-प्रांतावरचं कौतुक जरा आवरतं घे ना !

**अनंत**—( जवळ जाऊन ) तुझ्या दैदिप्यमान प्रकाशांत माझ्या प्रेम-जीवनाचं निर्वापन होऊं दे. ( दिवे बारीक होतात. आणि दूर कुठं तरी तीं दोघे मुख-संलग्न झालेलीं दिसतात.

समाप्त

मुद्रकः—नरहर रामचंद्र जोशी, मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाव वाडी, गिरगांव—मुंबई नं. ४.

प्रकाशकः—श्रीपतराव स. उपरे, बॉम्बेथिएटर, ग्रॅन्टरोड मुंबई.

७१११
नाटक

# नटांचा परिचय

| | |
|---|---|
| अनंत | श्री. कृष्णराव शेंडे |
| [illegible] | श्री. मानकामे |
| [illegible]काका | श्री. गणपतराव फडके |
| डॉ. बापूराव | नकलाकार पंडीत |
| गोविंद | मास्टर विनायक |
| [illegible] | श्री. भिसे |
| सर्जू | श्री. जोग |
| माणिक | मिस नलिनी |
| चंपू | मिस लीला |
| ज्योती | मिस शांता |
| पार्वती | मास्तर मोहन |
| हार्मोनियम मास्तर | श्री. [illegible]जीबुवा |
| तबलजी | श्री. जगन्नाथ |
| सारंगीवाले | श्री. गंगाराम व रघुनाथ |